# निळारंभ

हे निळारंभ मुक्तसे
काही मला खुणावे
बोलेल जरी मजपाशी
मन करीन मोकळे ॥ १ ॥

माझ्या उरात दाटे
व्यथा बरे कशाची
करतील दूर काय
तिज मेघ सावळे ॥ २ ॥

बोलू कसा तयाला?
जीव आर्त गुदमरे
संकेत विहंग सांगे
घे भरारी अवखळे ॥ ३ ॥

मी बोलता जरासा
तोही भरून आला
तळमळ झुगारूनी
तो विजेत विरघळे ॥ ४ ॥

हा पाऊस आसवांचा
वाहून हर्ष त्याला
मी ही भिजून चिंब
दु:ख सारे निमाले ॥ ५ ॥

**सचिन कुलकर्णी**
www.saarthbodh.com